**खाजगी अनुदानित व विनाअनुदानित अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांमधील सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी कमाल वयोमर्यादा सुधारित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्र:-इडीडी २०१६/प्र.क्र.२३३/अ.क.१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-२९ मे, २०१७.

<u>वाचा</u>:- १) या विभागाचा शासन निर्णय क्रमांक-इडीडी २००५/प्र.क्र.३५६/सुधार-२, दिनांक ४.७.२००९,
२) शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.अकंपा-२०१०/प्र.क्र.३०८/१०/आठ दिनांक ६.१२.२०१०,
३) शासन निर्णय क्रमांक-इडीडी-२०११/प्र.क्र. ३६६/अ.क.१, दिनांक २.१२.२०१५,
४) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे पत्र क्र.जिप/सक/अवि/ १६-१७/६६७/दिनांक १.७.२०१६.

**<u>प्रस्तावना</u>:-**

सेवेत असताना दिवंगत झालेल्या अनुदानित व विनाअनुदानित खाजगी अपंगांच्या विशेष शाळा/ कर्मशाळांमधील पात्र कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियास अनुकंपा तत्वावर नियुक्ती योजनेमध्ये शासन निर्णय दिनांक ४.७.२००९ चे सहपत्र-नियमावली परिशिष्ट-अ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ४० वर्ष इतकी विहीत करण्यात आलेली आहे. या कमाल वयोमर्यादेच्या अटीमुळे प्रतिक्षासूचीवरील उमेदवारांची नांवे नियुक्ती मिळण्यापूर्वीच वयोधिक्यामुळे वगळली जात असल्याने सदर वयोमर्यादेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ६.१२.२०१० च्या शासन निर्णयान्वये शासकीय कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियांना अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी याआधी असलेल्या ४० वर्ष या कमाल वयोमर्यादेत वाढ केली असून ती आता वयाची ४५ इतकी केलेली आहे. त्याआधारे शासन निर्णय दिनांक ४.७.२००९ नुसार अनुकंपा नियुक्तीसाठी असलेली कमाल वयोमर्यादेची सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेली तरतूद अधिक्रमित करून सुधारित तरतूद लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :-**

१) सेवेत असताना दिवंगत झालेल्या अनुदानित व विनाअनुदानित खाजगी अपंगांच्या विशेष शाळा/ कर्मशाळांमधील पात्र कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी या आधी असलेल्या ४० वर्षे या कमाल वयोमर्यादेत वाढ करण्यात येत असून ती आता वयाची ४५ वर्षे इतकी राहील.

२) सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ६.१२.२०१० च्या शासन निर्णयान्वये पात्र शासकीय कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियांना अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी याआधी असलेल्या ४० वर्ष या कमाल वयोमर्यादेत वाढ केली असून ती आता वयाची ४५ इतकी केलेली आहे.

३) त्याआधारे अनुकंपा नियुक्तीसाठी हे आदेश दिनांक ६.१२.२०१० पासून लागू राहतील.

४) वरील सुधारणे व्यतिरिक्त शासन निर्णय दिनांक ४.७.२००९ सोबतच्या परिशिष्ट-अ मधील उर्वरित नियमावलीत बदल होणार नाही.

५) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०६०३११२८३६७१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(दि.रा.डिंगळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२) मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव,
३) मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव,
४) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) सचिव (सा.न्या.) मंत्रालय, मुंबई,
६) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे,
७) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण,
८) सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
९) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/मुंबई उपनगर,
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१४) सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-आठ,
१५) निवड नस्ती, अपंग कल्याण-१.